**रे.दि. मु. नं. ५०/२०१२ मधील नि.क्र.२१२ खालील आदेश**
**(अशोक बुवासाहेब नायकवडी वगैरे वि. रुपाली विजयकुमार रासकर वगैरे)**
**CNR No.- MHST16-000253-2012**

वादीने सदरचा अर्ज त्याला जादा पुरावा देण्यास परवानगी दयावी. त्याच्या म्हणण्यानुसार तो आजारी होता. त्याचे प्रोटेस्ट ग्रंथीचे ऑपरेशन झाले आहे. त्याला स्मृतीभ्रंश झालेला आहे, त्याला मानसिक कमजोरी आहे व त्यामुळे त्याला काहीही समजत उमजत नाही. दिनांक ६.४.२०२३ रोजी न्यायालयाने त्याचा अर्ज नामंजुर केला. त्यामुळे त्याला जादा पुरावा देण्याकरिता परवानगी देण्यात यावी. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र.१,२,३अ ते ३ई, ४ व ५ यांनी त्यांचे म्हणणे नि.२१४ वर दाखल केले आहे. त्यांनी अर्जातील कथने नाकारली आहेत.

२. सर्व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की दि.१७.१.२०२३ रोजी अतिरिक्त मुद्दे काढण्यात आले व त्यानंतर दि.३०.१.२०२३ रोजी वादी क्र.१ चे जादा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नोंदवण्यात आले. त्यानंतर दावा वादीचा जादा सरतपास व उलटतपासाकरिता प्रलंबित होता. दिनांक ६.४.२०२३ रोजी नि.२०९ वर वादीने मुदत मिळण्याकरिता अर्ज दिला. तो नामंजुर करण्यात आला. वादीचा जादा पुरावा या पुर्वीच त्याने दाखल केलेला आहे. अदयाप पर्यंत वादीचा पुरावा बंदचे आदेश किंवा कोणतेही आदेश पारित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वादी त्याचा पुरावा देवू शकतो. सबब अर्ज दाखल करुन घेण्यात येत आहे.

CHHAYA VIKRAM SHIRSAT
Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2023.10.21 16:56:30 +0530

ठिकाण – वाई.
(सी. व्ही. शिरसाट)

दिनांक – ११.१०.२०२३.
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.